**<u>ठळक बातम्या</u>**

- हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारकडून ७५ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर

- लोकसभेत वंदे मातरमवर चर्चा, समृद्ध भारताची भावना वंदे मातरम् मुळे फलद्रुप होईल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांकडून व्यक्त

- शेअर बाजारात जोरदार नफा वसुली, निफ्टी २६ हजार अंकांच्या खाली

आणि

- नांदेडमध्ये झालेल्या आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात पुणे विद्यापीठ प्रथम, मुंबई दुसऱ्या स्थानी

<><><><><>

विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन आजपासून नागपुरात सुरू झालं. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारनं आज ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त दोन्ही सभागृहात आज वंदे मातरमचं सामूहिक गायन झालं. त्यानंतर तालिका अध्यक्षांची नियुक्ती झाली. काँग्रेस नेते नाना पटोले आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव यांनी हे अधिवेशन वाढवून देण्याची मागणी अध्यक्षांकडे केली. विधिमंडळाचं कामकाज गुंडाळण्याचा प्रयत्न करण्यात येत असून कामकाज घाईघाईनं उरकलं जात आहे, असा आरोप पटोले यांनी केला. यावर विधिमंडळाचं अधिवेशन आणि कामकाज याविषयी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सर्वसंमतीनं निर्णय होतो, त्यामुळे आता वेगळी चर्चा होणार नाही, असं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं. तर आचारसंहितेमुळे हे अधिवेशन अल्पकालीन असल्याचं स्पष्ट करून हा कालावधी पुढील अधिवेशनात भरून काढू अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.*

*या अधिवेशनातही सरकारनं पुरवणी मागण्या मांडल्या. ७५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या या पुरवणी मागण्यांपैकी १५ हजार ६४८ कोटी रुपये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी राखीव आहेत. लाडकी बहीण योजनेसाठी ६ हजार कोटींहून अधिक तर मनरेगासाठी साडे ३ हजार कोटी रुपयांची तरतूद यात आहे. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी ३ हजार कोटी रुपये तर एसटी महामंडळासाठी २ हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत. आयुष्मान भारतासाठी सव्वा ३ हजार कोटी, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी २ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद सरकारनं यात केली आहे.*

*त्यानंतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.)*

<><><><><>

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाला आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत नागपूर इथं सुरुवात झाली. शहीद जवानांच्या कुटुंबांना राज्य सरकारकडून दिली जाणारी मदतीची रक्कम ४ पट वाढवून एक कोटी केल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

समृद्ध भारताची भावना वंदे मातरम् मुळे फलद्रुप होईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वर्तवला आहे. लोकसभेत आज वंदे मातरम गीतावरच्या चर्चेला सुरूवात करताना ते बोलत होते. या चर्चेविषयी सविस्तर जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून

**-- - होल्ड - कॅप्सूल - - -**

*(ज्या वंदे मातरम् मंत्राने स्वातंत्र लढ्यासाठी प्रेरणा दिली, तोच मंत्र समृद्धतेचीही प्रेरणा देईल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. वंदे मातरम् ही फक्त स्मरण करण्याची बाब नव्हे तर संस्कृतीच्या अखंड प्रवाहाचं प्रतिबिंब असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. आपल्यावर वंदे मातरम् चं ऋण असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं, ते म्हणाले –*

*- - होल्ड… बाईट - प्रधानमंत्री- -*

*यावेळी त्यांनी वंदे मातरमच्या दीडशे वर्षांच्या इतिहासाचा मागोवा घेतला. तसंच काँग्रेसच्या धोरणांवर टीका केली.*

*वंदे मातरम हा समर्पण आणि एकतेचा एक कालातीत मंत्र असून भारताच्या स्वावलंबन आणि प्रगतीच्या संकल्पाला तो प्रेरणा देतो, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग या चर्चेत म्हणाले.*

*- - - होल्ड - राजनाथ सिंग - -*

*बंगालच्या पवित्र भूमीने भारताला फक्त वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत नाही, तर देशाला त्याचं राष्ट्रगीतही दिलं, असं प्रतिपादन काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी या चर्चेदरम्यान केलं. तसंच प्रधानमंत्र्यांनी या चर्चेला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न केल्याची टीकाही गोगोई यांनी केली. वंदे मातरम गीतावरच्या चर्चेद्वारे सरकार सध्याच्या आव्हानांपासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका काँग्रेस खासदार प्रियांका गांधी यांनी केली आहे. वंदे मातरम हे गीत देशाचा आत्मा आहे आणि त्यावर कोणताही प्रतिवाद होऊ शकत नाही, असं गांधी म्हणाल्या.*

*- - होल्ड - प्रियंका गांधी - -*

*धर्माच्या आधारावर होणारं राजकारण फेटाळून लावणं हा वंदे मातरमचा उद्देश होता असं समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव म्हणाले. श्रीरंग बरणे, अरविंद सावंत, भास्कर भगरे यांच्यासह विविध खासदारांनी या चर्चेत सहभाग घेतला.)*

<><><><><>

नफावसुली आणि परदेशी गुंतवणूकदारांनी केलेल्या विक्रीमुळं देशातल्या शेअर बाजारात आज जोरदार घसरण झाली. अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या पतधोरण आढाव्याच्या पार्श्वभूमीवरही गुंतवणूकदार साशंक आहेत. दिवसअखेर सेन्सेक्स ६१० अंकांची घट नोंदवून ८५ हजार १०३ अंकांवर बंद झाला. तर निफ्टी २२६ अंकांनी घसरुन २५ हजार ९६१ अंकांवर थांबला. सत्रादरम्यान दोन्ही निर्देशांक आणखी जास्त घसरले होते पण नंतर त्यात थोडी सुधारणा झाली. बांधकाम उद्योग, बँका यासारख्या क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागात आज मोठी घसरण झाली.

<><><><><>

नांदेडमधल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवाचं सर्वसाधारण विजेतेपद सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला तर उपविजेतेपद मुंबई विद्यपीठानं पटकावलं. स्पर्धेचं तृतीय क्रमांकाचं पारितोषिक डॉ.

बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विद्यापीठाच्या संघाला मिळालं.

या स्पर्धेत खो -खो, बुद्धिबळ, कब्बडी, बॅडमिंटन, टेबल टेनिस अशा विविध क्रीडाप्रकारांचे सामने झाले.

<><><><><>

१ ते ७ डिसेंबर या कालावधीत ५ लाख ८६ हजार सातशे विमानांची तिकीटं रद्द झाली असून प्रवाशांचे ८२७ कोटी रुपये परत करण्यात आल्याचं नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने एका निवेदनाद्वारे सांगितलं. ९ हजार बॅगांपैकी साडे चार हजार बॅगा प्रवाशांच्या नियोजित पत्त्यावर पोहोचवण्यात आल्या असून उर्वरीत बॅगा पुढच्या ३६ तासांत परत केल्या जातील असं त्यात म्हटलं आहे. इंडियो एअरलाईन्स विमानाच्या एक हजार ८०० फेऱ्या १३७ ठिकाणी चालवण्यात येणार असून पाचशे फेऱ्या रद्द केल्याचं मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

नंदुरबार जिल्ह्यातल्या सारंगखेडा इथल्या घोडे बाजारानं पाच दिवसांत एक कोटी रुपयांची उलाढाल केली आहे. या बाजारात देशभरातून २ हजार ८०० हून अधिक घोडे विक्रीसाठी आले होते. आज पाचव्या दिवशी या बाजारात २७५ घोड्यांची विक्री झाली असून, १ कोटी २८ लाख १२ हजार शंभर रुपयांचा व्यवहार झाला आहे. आणखी पंधरा दिवस हा बाजार सुरू राहणार आहे.

<><><><><>

कोकण रेल्वेमार्गावरून ऑगस्ट ते नोव्हेंबर या चार महिन्यांमधल्या आठ चोऱ्यांचा तपास करून रत्नागिरी लोहमार्ग पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे. त्याच्याकडून सुमारे ५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती लोहमार्ग मुंबई हार्बर विभागाच्या सहायक पोलीस आयुक्त नीलिमा कुलकर्णी यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली.

<><><><><>

केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या नवोन्मेष विभागानं सुरू केलेल्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनच्या आठव्या आवृत्तीला आज देशभरातल्या ६० नोडल केंद्रांवरून सुरुवात झाली. मुंबईत वेलिंगकर इस्टिट्यूटमध्ये आज आणि उद्या सॉफ्टवेअर विभागाच्या अंतिम फेरीचं

आयोजन करण्यात आलं आहे. यंदा या आवृत्तीसाठी ७२ हजार १६५ अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी १ हजार ३६० संघ अंतिम फेरीत पोहोचले आहेत.

<><><><><>

गेल्या २४ तासात उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी तापमान यवतमाळ इथं ८ पूर्णांक ८ दशांश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात विदर्भात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//